

शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनोसायन्स व तंत्रज्ञान अधिविभागातील सहयोगी प्राध्यापक डॉ. सुबोध प्रभू यांची दि दलाई लामा फेलोशिपसाठी निवड झाल्याबद्दल कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी पी. एस. पाटील, विजय फुलारी आदी उपस्थित होते.

# सुबोध प्रभू यांना 'दलाई लामा फेलोशिप'

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील स्कूल ऑफ नॅनोसायन्स व तंत्रज्ञान अधिविभागात सहयोगी प्राध्यापक (ॲडजंक्ट प्रोफेसर) आणि आंतरराष्ट्रीय ख्यातीचे मेंदू शास्त्रज्ञ डॉ. सुबोध (शिवदत्त) प्रभू यांची दि दलाई लामा फेलोशिपसाठी निवड झाली आहे. त्याद्वारे ते 'न्यूरोलॉजिकल को-रिलेट्स ऑफ बुद्धिस्ट फिलॉसॉफी'या विषयावरील शास्त्रीय शोधप्रबंध वर्षभरात सादर करतील.

बौद्ध धर्मगुरू दलाई लामा यांना मिळालेल्या नोबेल पारितोषिकाच्या रकमेतून दरवर्षी आंतरविद्याशाखीय संशोधनासाठी एका संशोधकाची फेलो म्हणून निवड केली जाते. यंदा या फेलोशिपसाठी डॉ. प्रभू यांची निवड झाली. त्यांनी फ्रान्समध्ये ग्रेनोबल येथे औषधांना दाद न देणाऱ्या आणि मेंदू शस्त्रक्रिया शक्य नसलेल्या फिट्सवर डी.बी.एस. या नावीन्यपूर्ण उपचार पद्धतीबाबत ६ वर्षे संशोधन केले. यासाठी त्यांना फेडरेशन ऑफ युरोपियन न्यूरो सायन्स सोसायटीजची वैयक्तिक ग्रँट मिळाली. फेलोशिपसाठी निवड झाल्याबद्दल डॉ. सुबोध प्रभू यांचा कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांचा सत्कार केला.

## 'बिहेविअरल इकॉनॉमिक्स'चे सल्लागार

भारतात परतल्यावर बहुराष्ट्रीय कंपन्यांसाठी 'बिहेविअरल इकॉनॉमिक्स' विषयाचे सल्लागार म्हणून डॉ. सुबोध प्रभू यांनी काम सुरु केले. फ्रान्समधील युनिव्हर्सिटी ऑफ ग्रेनोबल येथील ब्रेनटेक संस्थेत 'ट्रान्सलेशनल थेरपीज' विषयातील संशोधक विद्यार्थ्यांचे सहमार्गदर्शक म्हणूनही ते काम पाहतात. ज्येष्ठ न्यूरोसर्जन डॉ. संतोष प्रभू यांचे सहकारी म्हणून त्यांनी काम केले आहे.

# शिवाजी विद्यापीठ गुणवत्तेत अव्वल

## 'नॅक'चे 'ए प्लस प्लस' मानांकन



लोकसत्ता प्रतिनिधी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाने 'नॅक' मूल्यांकनातील आपला अव्वल दर्जा याही वेळी कायम राखला आहे. राष्ट्रीय मूल्यांकन तथा प्रत्यायन परिषदेने (नॅक) शिवाजी विद्यापीठाला 'ए प्लस प्लस' मानांकन जाहीर केले आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या 'नॅक' मानांकनाची प्रक्रिया गेले काही दिवस सुरू होती. यावेळच्या बदललेल्या पद्धतीप्रमाणे ७० टक्के गुण हे संख्यात्मक माहिती आधारे दूरभाष संवादाद्वारे देण्यात आले होते. उर्वरित ३० टक्के गुणांसाठी विद्यापीठात प्रत्यक्ष पाहणी होणार होती. त्यासाठी 'नॅक' समितीचे अध्यक्ष प्रा. जे. पी. शर्मा यांच्यासह त्यांच्या पथकाने १५ ते १७ मार्च या कालावधीत विद्यापीठात कुलगुरू, प्राध्यापक, आजी-माजी विद्यार्थी, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी यांच्याशी चर्चा केली होती. त्याचे सादरीकरणही करण्यात आले होते. या समितीने विद्यापीठातील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, अभ्यासक्रम, अध्ययन, अध्यापन, संशोधनाचा उच्च दर्जा असल्याचा अहवाल 'नॅक'च्या बंगळुरू कार्यालयास सादर केला होता. या अहवालावर कार्यालयीन प्रक्रिया होऊन 'ए प्लस प्लस' मानांकन जाहीर करण्यात आले. त्याचे पत्र विद्यापीठाला मिळताच ही माहिती विद्यापीठाने संकेतस्थळावर जाहीर केली.

मानांकन उंचावण्यासाठी प्रयत्नशील असलेले कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आदींचे अनेक प्रतिष्ठितांनी आणि बुद्धिवंतांनी अभिनंदन केले. कुलगुरू पदाची सूत्रे अलीकडेच हाती घेतलेले डॉ. शिर्के यांना लगेचच मानांकनाच्या महत्त्वाच्या प्रक्रियेला सामोरे जावे लागले होते. उच्च दर्जाचे मानांकन मिळाल्याने त्यांनी आनंद व्यक्त केला.

### विद्यापीठाचीच 'परीक्षा'

- ७० टक्के गुण संख्यात्मक माहिती आधारे दूरभाष संवादाद्वारे देण्यात आले होते. उर्वरित ३० टक्के गुणांसाठी विद्यापीठात 'नॅक' समिती प्रत्यक्ष पाहणी केली होती.
- 'नॅक' समितीचे अध्यक्ष प्रा. जे. पी. शर्मा यांच्या नेतृत्वाखालील पथकाने कुलगुरू, प्राध्यापक, आजी-माजी विद्यार्थी, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी यांच्याशी चर्चा केली.
- 'नॅक' समितीने विद्यापीठातील अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष, अभ्यासक्रम, अध्ययन, अध्यापन आणि संशोधनाचा दर्जा उच्च असल्याचा अहवाल 'नॅक'च्या बंगळुरू कार्यालयास सादर केला. त्यानुसार 'ए प्लस प्लस' मानांकन जाहीर करण्यात आले.

"

**माझ्या कुलगुरुपदाच्या प्रारंभीच्या काळातच उच्च दर्जाचे यश मिळाल्याने आनंद झाला. विद्यापीठातील सर्व घटकांना सामावून गुणवत्ता वाढीसाठी कायम प्रयत्नशील राहण्याचा निर्धार आहे.**

— **डॉ. डी. टी. शिर्के**, कुलगुरु, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

जनसंपर्क कक्ष
0 8 APR 2021 तरुण भारत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ऑनलाईन परीक्षेसाठी शनिवारपर्यंत पर्याय द्यावा

▪ परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांचे आवाहन

प्रतिनिधी
कोल्हापूर

कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ६ ते १२ एप्रिल दरम्यानच्या अधिविभाग व महाविद्यालयीन परीक्षा पुढे ढकलण्यात आल्या आहेत. विद्यापीठाच्या सर्वच परीक्षा ऑनलाईन होणार असून ज्यांनी ऑफलाईन पध्दतीने परीक्षा अर्ज भरले आहेत, त्यांना ऑनलाईन पर्याय निवडण्यासाठी शनिवार १० एप्रिलपर्यंत मुदत देण्यात आली आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या **online.unishivaji.ac.in, october2020exam,** या लिंकवर पर्याय द्यावा, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी केले आहे.

कोरोनाचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी विद्यार्थ्यांनी ऑनलाईन परीक्षा द्यावी, असा निर्णय अधिकार मंडळाने घेतला आहे. तरी परीक्षेचा ऑफलाईन पर्याय निवडलेल्या विद्यार्थ्यांना महाविद्यालय स्तरावर लिंकव्दारे ऑनलाईन पर्याय उपलब्ध करून द्यावा. विद्यार्थ्यांनी सध्या पुर्वीची रिसिट परीक्षा देतेवेळी सोबत ठेवावी. तरी विद्यार्थ्यांनी १० एप्रिलपर्यंत ऑनलाईन परीक्षेचा पर्याय निवडून सहकार्य करावे. आवाहनाला प्रतिसाद न देता जे विद्यार्थी ऑनलाईन पद्धतीने परीक्षा देतील अशा विद्यार्थ्यांची परीक्षा कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्यानंतर सवडीने घेतली जाईल, याची विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी, असे अवाहनही पत्रकाव्दारे पळसे यांनी केले आहे.



### क्लस्टर पद्धतीने परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांनी पर्याय देऊ नये

अभियांत्रिकी, फार्मसी, आर्किटेक्ट, विधी, एज्युकेशन ॲन्ड एमबीए या अभ्यासक्रमाच्या परीक्षा क्लस्टर पद्धतीने होणार आहेत. त्यामुळे या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठाच्या लिंकवर नोंद करून पर्याय देऊ नयेत.

पुण्यनगरी

# ऑनलाईन पर्याय १० एप्रिलपर्यंत सादर करा

## शिवाजी विद्यापीठाचे विद्यार्थ्यांना आवाहन

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठातर्फे कोरोना प्रादुर्भावामुळे दि. १२ एप्रिलपर्यंतच्या ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने होणाऱ्या परीक्षा स्थगित करण्यात आलेल्या आहेत. कोरोनाचा प्रसार वाढत असल्याने विद्यापीठ कार्यक्षेत्रामध्ये निर्बंध लागू करण्यात आले आहेत. सध्या ऑफलाईन पद्धतीने परीक्षा घेणे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने उचित होणार नाही. त्यामुळे ज्या विद्यार्थ्यांनी विद्यापीठामार्फत घेण्यात येणाऱ्या हिवाळी सत्र २०२० साठी यापूर्वी ऑफलाईन पद्धतीचा परीक्षेचा पर्याय निवडलेला आहे आणि ज्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा दि. ६ एप्रिलपासून ऑफलाईन पद्धतीने होणार होत्या, अशा सर्व विद्यार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने परीक्षा देण्यासाठी दि. १० एप्रिल रोजी सायंकाळी ५ पर्यंत पर्याय निवडण्यात यावे, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा विभागातर्फे करण्यात आले आहे.


सकाळ



कोल्हापूर : विद्यापीठाच्या पूर्वेला शेततळ्याचे काम सुरू आहे.

# विद्यापीठात होणार नवी १० शेततळी

ओंकार धर्माधिकारी :
सकाळ वृत्तसेवा



कोल्हापूर, ता. ७ : जलयुक्त विद्यापीठ अशी ओळख असणाऱ्या शिवाजी विद्यापीठात आणखी नवी १० शेततळी होणार आहेत. यातील ७ शेततळी ही शासकीय योजनेतून होणार असून, तीन शेततळी विद्यापीठाच्या निधीतून होणार आहेत. त्यामुळे विद्यापीठातील जलसाठवणुकीमध्ये ५० लाख लिटरची भर पडेल. भविष्यात वाढणारी विद्यार्थी संख्या लक्षात घेऊन या शेततळ्यांचे काम सुरू केले आहे.

विद्यापीठाला पूर्वी पाण्याचा प्रश्न सातत्याने भेडसावत होता; मात्र गेल्या काही वर्षांत प्रशासनाने जलसंधारणाची कामे केल्यामुळे विद्यापीठ पाण्याच्या बाबतीत स्वयंपूर्ण झाले. सध्या विद्यापीठात ३१ कोटी लिटर पाणी साठवले जाते. त्यानंतर ते प्रक्रिया करून विद्यार्थ्यांना पिण्यासाठी दिले जाते. जलसंधारण उपक्रमामुळे विद्यापीठ परिसरात मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण झाले. विशेष म्हणजे पाण्याची उपलब्धता, योग्य देखभालीमुळे झाडे जगण्याचे प्रमाण अन्य ठिकाणांपेक्षा जास्त आहे. महापुराच्या काळात शहरातील पाणीपुरवठा बंद होता. या काळात विद्यापीठातून महापालिकेने पाणी उपसा करून नागरिकांना पाणी दिले होते.

> **भविष्यातील पाण्याची गरज पूर्ण करण्यासाठी नवीन १० शेततळी बांधली जात आहेत. त्यामुळे पाणीसाठ्यात वाढ होईल. शेततळे बांधताना जो मुरूम, माती निघेल त्याचा उपयोग विद्यापीठातील अन्य सुशोभीकरणाच्या कामासाठी केला जाईल, अशा पद्धतीने नियोजन केले आहे.**
> **-डॉ. व्ही. एन. शिंदे,**
> उपकुलसचिव, शिवाजी विद्यापीठ.

विद्यापीठातील जलसंधारणामुळे भूगर्भातील पाणीसाठा वाढला व आसपासच्या परिसरातील विहिरी, कूपनलिका येथील पाण्याचे प्रमाणही वाढल्याचा दावा नागरिकांचा आहे. सध्या विद्यापीठातील पाण्याची गरज उपलब्ध पाणीसाठ्यावर पूर्ण होते; मात्र भविष्यात विद्यार्थ्यांची संख्या वाढणार आहे. त्यामुळे पाण्याची गरजही वाढेल. अशा काळात पाण्याचा तुटवडा निर्माण होऊ नये यासाठी विद्यापीठाने दूरदृष्टीने विचार करून नवीन शेततळी बांधण्यास सुरवात केली आहे. नवीन शेततळी विद्यापीठाच्या पूर्वेला बांधण्यात येणार आहेत. यंदाच्या पावसाळ्यात शेततळ्यात पाणी साठवले जाईल, अशा पद्धतीने नियोजन केले आहे.

## विद्यापीठाचे जलवैभव...

| | |
|---|---|
| शेततळी | १३ |
| विहिरी | १० |
| तलाव | २ |
| एकूण पाणीसाठा | ३१ कोटी लिटर |

# शिवाजी विद्यापीठाच्या परीक्षा होणार ऑनलाईन

## कोरोनाची पार्श्वभूमी : विद्यार्थ्यांनी ऑफलाईनचा पर्याय बदलावा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** कोरोनाचा प्रादुर्भाव वाढू लागल्याने पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या यापुढील सर्व परीक्षा ऑनलाईन पद्धतीने शिवाजी विद्यापीठ घेणार आहे. त्यादृष्टीने परीक्षा व मूल्यमापन मंडळाने तयारी सुरू केली आहे. कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांतील ५४ हजार विद्यार्थ्यांनी परीक्षा देण्यासाठी ऑफलाईन पर्याय निवडला होता. त्यांनी आता ऑनलाईन पर्याय निवडावा, असे आवाहन परीक्षा मंडळाकडून बुधवारी करण्यात आले.

विद्यापीठाच्या हिवाळी सत्रातील परीक्षा २२ मार्चपासून ऑनलाईन, ऑफलाईन पद्धतीने सुरू झाल्या. विविध २५ अभ्यासक्रमांच्या परीक्षा पूर्ण झाल्या आहेत. सध्या द्वितीय वर्ष बी.ए., बी.कॉम., बी.एस्सी., एम.ए., एम.कॉम., एम.एस्सी, अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरू होत्या. त्यातच राज्य सरकारने कोरोनाचा प्रादुर्भाव वाढू लागल्याने 'ब्रेक दी चेन'अंतर्गत निर्बंधांबाबतची नवी नियमावली लागू केली. त्यावर पदवी, पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या परीक्षा घेण्याबाबत शासनाचे स्पष्ट माहिती मिळेपर्यंत दि.१२ एप्रिलपर्यंतच्या परीक्षा लांबणीवर टाकण्याचा निर्णय विद्यापीठाने घेतला. विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली, सातारा जिल्ह्यांत कोरोनाचा प्रादुर्भाव वाढत असल्याने आणि संचारबंदी, इतर निर्बंध विचारात घेता ऑफलाईन परीक्षा घेणे विद्यार्थी सुरक्षेच्यादृष्टीने उचित होणार नाही. त्यामुळे या परीक्षा ऑनलाईन पद्धतीने घेण्याची तयारी सुरू केली असल्याची माहिती परीक्षा मंडळाचे प्रभारी संचालक गजानन पळसे यांनी बुधवारी दिली.

### सर्व विद्यार्थ्यांनी ऑनलाईन पर्याय निवडावा

ज्या विद्यार्थ्यांनी यापूर्वी ऑफलाईन परीक्षेचा पर्याय निवडला होता. ज्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा ६ एप्रिलपासून ऑफलाईन सुरू होणार होत्या अशा सर्व विद्यार्थ्यांनी शनिवार (दि. १०) पूर्वी ऑनलाईन परीक्षेचा पर्याय निवडावा, असे आवाहन पळसे यांनी केले आहे. अपवादात्मक परिस्थितीनुसार जे विद्यार्थी ऑफलाईन पद्धतीने परीक्षा देणार असतील, तर त्यांची परीक्षा कोरोनाचा प्रादुर्भाव कमी झाल्यानंतर घेण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

